दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक), नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




मुंबई || वर्ष २२ || अंक २०९ || शनिवार १३ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## आषाढीला व्हीआयपी दर्शन बंद

सोलापूर : मुख्यमंत्र्यांच्या पूजेच्यावेळी होणारी व्हीआयपी गर्दी टाळण्यासाठी देण्यात येणा-या पासेसवर नियंत्रण आणण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. वास्तविक मंदिराचा गाभारा, सोळखांबी लहान असल्याने जास्त व्हीआयपी आत आले तर मुख्यमंत्र्यांसह महत्वाच्या व्यक्तींना अनावश्यक गर्दीला सामोरे जावे लागते यामुळे मंदिर समितीशी ठरवून महापुजेला मर्यादित व्हीआयपींना प्रवेश देण्याचा प्रयत्न असल्याचे जिल्हाधिका-यांनी सांगितले.

याशिवाय महापूजा सुरु असताना मुखदर्शनाची रांग सुरूच राहणार असून महापूजा कमीतकमी वेळेत करण्यासाठी मंदिर समितीशी चर्चा केली जाणार असल्याचेही जिल्हाधिका-यांनी सांगितले. आषाढी यात्राकाळात दर्शन रांगेत हजारो भाविक असताना बंद केलेले व्हीआयपी दर्शन हे बंदच राहणार असून सर्वसामान्य भाविकांना



झटपट दर्शन मिळण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याची खंबीर भूमिका सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केली. प्रशासनाने कठोर भूमिका घेत सर्वच बड्या व्हीआयपी व्यक्तींनाही झटपट दर्शन देण्यास मनाई केल्याने बाकीचे घुसखोरी करणारे तथाकथित व्हीआयपी यांची घुसखोरी बंद झाली.

यामुळेच १५ तास रांगेत उभे राहणारे भाविक केवळ ४ ते ५ तासात आता देवाच्या पायापर्यंत पोहचत आहेत. याच पद्धतीने भाविकांना लवकरात लवकर दर्शन मिळण्यासाठी प्रशासन काम करत असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. दर्शन रांगेतील भाविकांना १५ लाख शुद्ध पाण्याच्या बाटल्या आणि मँगो ज्यूस दिला जाणार असून वापरलेल्या प्लास्टिक बाटल्या गोळा करून त्या नष्ट करण्यासाठी वेगळी यंत्रणा उभी केल्याचेही जिल्हाधिका-यांनी सांगितले.

## लाडकी बहीण योजनेचा फॉर्म भरताना अंगणवाडी सेविकेचा मृत्यू

सोलापूर : राज्यभरात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांनी तहसिल कार्यालयांवर तुफान गर्दी केली होती. त्यामुळे ही गर्दी कमी करण्यासाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला होता. त्यानुसार या महिलांकडून घरच्या घरीच अर्ज भरून घेण्यासाठी अंगणसेविका, अंगणवाडी मदतनीस, पर्यवेक्षिका, ग्रामसेवक, सेतू सुविधा केंद्र आणि सामान्य महिलांवर ही जबाबदारी सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार कामही सुरू झाले. पण हे काम सुरू असताना एक दुर्देवी घटना घडली आहे. लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरून घेत असताना एका अंगणवाडी सेविकेचा मृत्यू झाला आहे. हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने तिचा मृत्यू झाला आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा सर्व्हे करून फॉर्म भरण्याची जबाबदारी राज्य सरकारने अंगणवाडी सेविकांवर दिलेली आहे. त्यामुळे गावोगावच्या अंगणवाडी सेविका गावात घरोघरी फिरून नारी दूत या ॲपवरून फॉर्म भरीत आहेत. सोलापूरच्या मोहोळ तालुक्यातील देगाव मधील अंगणवाडी क्रमांक १ च्या सेविका फॉर्म भरत असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटक आल्याने त्या खुर्चीत कोसळल्या. यावेळी मदतनीस किचनमध्ये भांडी स्वच्छ करत होत्या. जोराचा आवाज झाला म्हणून घाबरून त्या आत आल्या असता अंगणवाडी सेविका सुरेखा आतकरे या खुर्चीत निपचित पडल्याच त्यांना दिसले.

## दुध दरवाढ आंदोलन आणखी पेटणार!

सांगली/मुंबई : दूध दरासाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलनावर तोडग्यासाठी मंत्रालयात नुकतीच आयोजित तिसरी बैठकदेखील कोणत्याही ठोस निर्णयाविना संपली. दुधाला ३० रुपये दरही देणार नसल्याची भूमिका खासगी कंपन्यांनी घेतली, त्यामुळे आंदोलन सुरुच ठेवण्याचा निर्णय समितीने घेतला असून दुध दरवाढ आंदोलन आता आणखी पेटणार असल्याचे संकेत दुध उत्पादकांनी शुक्रवार दि. १२ जुलै रोजी येथे दिले आहेत.

दुधाच्या वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर किमान ४० रुपये प्रतिलिटर भाव देण्याची मागणी समितीने केली. पशुखाद्याचे दर कमी करावेत व दूध प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी दुधाला रास्त व किफायतशीर भाव (एफआरपी) द्यावा अशी आग्रही मागणी समितीच्या प्रतिनिधींनी केली. साबळे म्हणाले, अनुदानाचा घोळ घालून शेतक-यांना यापुढे अधिक काळ फसवता येणार नाही. निवडणुका संपल्या की अनुदान बंद होईल, पुन्हा येरे माझ्या मागल्या हीच परिस्थिती दूध उत्पादकांसमोर निर्माण होईल. अटी व शर्तींच्या माध्यमातून दूध उत्पादकांना अनुदानापासून वंचित ठेवले जाईल असे होऊ नये यासाठी अनुदानाऐवजी उत्पादन खर्चावर किमान ४० रुपये प्रति लिटर भाव द्यावा. या माध्यमातून हा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा.

## आपण एकत्र यायला पाहिजे, राऊतांच्या विधानाने खळबळ

मुंबई : राज्यातील विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने कधीकाळी एकत्र असलेले अनेक जुने सहकारी एकमेकांना भेटले. या निवडणुकीसाठी शिवसेना उबाठा नेते आणि खासदार संजय राऊत विधिमंडळ परिसरात आले होते. त्यावेळी त्यांची आणि



भाजप नेते चंद्रकांत पाटील यांची भेट झाली. या भेटीवेळी आपण एकत्र यायला पाहिजे, असे संजय राऊत यांनी चंद्रकांत पाटील यांना उद्देशून म्हटले. त्यानंतर राज्यातील राजकारणात पुन्हा नव्या समीकरणांची चर्चा सुरु झाली. राऊत यांच्या वक्तव्यानंतर दोन जुने मित्रपक्ष पुन्हा एकत्र येणार की काय? या चर्चेला उधाण आले आहे.

२०१९ ची विधानसभा निवडणूक भाजप आणि शिवसेनेने एकत्र लढवली. या युतीला जनतेने बहुमत दिले. परंतु निवडणूक निकालानंतर मुख्यमंत्री पदावरुन दोन्ही पक्षांमध्ये वाद सुरु झाला. त्यानंतर दोन्ही पक्षांनी वेगळी भूमिका घेतली आणि युती तुटली. त्यानंतर भाजपने अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा प्रयत्न केला. परंतु ते सरकार काही तासांमध्ये पडले. शेवटी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत शिवसेना गेली. महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये मुख्यमंत्रीपद उद्धव ठाकरे यांना मिळाले. जून २०२२ मध्ये राज्यातील राजकारणात आणखी एक भूकंप झाला. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील ४० आमदारांना सोबत घेऊन आपला वेगळा गट स्थापन केला. ते भाजपसोबत गेले.

विधान परिषद निवडणूक निमित्ताने संजय राऊत आणि चंद्रकांत पाटील यांची भेट झाली. त्या भेटीत आपण एकत्र यायला पाहिजे, असे संजय राऊत यांनी म्हटल्यामुळे राज्यातील राजकारण पुन्हा बदलणार असल्याच्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

## एसटी कर्मचारी वेतनवाढीसाठी ९ ऑगस्टपासून संपावर जाणार

मुंबई : दीर्घकाळानंतर एसटी कर्मचा-यांच्या विविध संघटनांनी एकत्र येत एसटी कर्मचा-यांना सरसकट पाच हजार रुपये वेतन वाढ द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन सुरू केले. मागण्या मान्य न झाल्यास ९ ऑगस्टपासून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला.

विलीनीकरणाच्या मागणीसाठी गुणवंत सदावर्ते यांच्या नेतृत्वाखाली दोन वर्षांपूर्वी सहा महिने एसटी कर्मचा-यांनी आंदोलन केले. तेव्हा विलीनीकरणाची मागणी चुकीची असल्याचे सांगण्यात येत होते.



विलीनीकरणाऐवजी शासनाने वेतनवाढ दिली. तरीही सदावर्ते यांनी कर्मचा-यांचे आंदोलन रेटले. एसटीच्या तत्कीन संघटनांचा प्रभाव या आंदोलनाने कमी केला.

मान्यताप्राप्त संघटनेची मान्यता रद्द झाली. पुढे सदावर्ते यांचे संचालक मंडळ एसटी बँकेवर निवडून आले. त्यानंतर बँकेचा कारभार वादात सापडला. कर्मचा-यांना सहज मिळणारे कर्ज व ठेवीचे पैसे परत मिळणे मुश्कील झाले. यातच सदावर्ते यांनी नातेवाइकाला बँकेच्या उच्चपदावर नियुक्त केले. कर्मचा-यांची बनावट भरती केली. त्यातूनही लाभ कमवला असे अनेक आरोप झाले.

सदावर्तेना बाजूला करून एसटी कर्मचा-यांच्या ९ संघटनांनी कर्मचारी हिताच्या मागण्यांसाठी मुंबईत धरणे आंदोलन सुरू केले. ९० हजार कर्मचा-यांच्या कुटुंबातील प्रत्येकी चार मतदार धरले तरी साडे तीन ते चार लाख मतदारांची नाराजी सत्ताधा-यांवर ओढवली जाणार आहे.

## सरकारी वकील प्रवीण चव्हाण यांच्याविरुद्ध दहा कोटींच्या खंडणीचा गुन्हा

मुंबई : न्यायालयीन कोठडी दरम्यान सुनावणी कालावधीत विशेष सरकारी वकील प्रवीण पंडित चव्हाण यांनी जातीवाचक टिप्पणी करत दहा कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याचा आरोप माजी आमदार रमेश कदम यांनी केला आहे.

कदम यांच्या तक्रारीनुसार कुलाबा पोलिसांनी चव्हाण यांच्याविरोधात खंडणीचा गुन्हा नोंद केला आहे.

माजी आमदार रमेश नागनाथ कदम यांच्या तक्रारीनुसार सन २०१४ ते २०१९ या कालावधीत दहिसर पोलिस स्टेशनला फसवणुकीसह लाचलुचपत प्रतिबंध कायद्यान्वये दाखल गुन्ह्यात कदम यांना अटक झाली होती. त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली होती.

पोलिस बंदोबस्तात न्यायालयीन सुनावणीसाठी सत्र न्यायालयात त्यांना आणले जात असताना २१ जानेवारी २०१६ रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास न्यायालय प्रवेशद्वारातच चव्हाण यांनी कदम यांच्याकडे रागाने बघून जातीवाचक विधान केल्याचा आरोप आहे. याशिवाय 'तू जे पैसे खाल्लेत त्यातील दहा करोड रुपये मला दे, पैसे दिले नाहीत तर तू जेलमधून कधीही सुटणार नाही. अनेक वर्ष जेलमध्येच रहावे लागेल', असे म्हणत आपणास धमकावल्याचा आरोप कदम यांनी केला आहे.

या घटनेच्या वेळी गुन्ह्याच्या तपास अधिकारी हजर असल्याचे कदम यांनी तक्रारीत म्हटले आहे. न्यायालयीन कोठडीत असल्याने चव्हाणविरुद्ध तक्रार केल्यास आपणास न्याय मिळण्याची आशा नसल्यामुळे त्यावेळी आपण तक्रार केली नाही असे कदम यांचे म्हणणे आहे.

## घोटाळेच घोटाळे! दोन बायका अन् मुलींच्या नावावर बक्कळ पैसा! समृद्धीने मोपलवार झाले मालामाल

मुंबई : आमदार रोहित पवार यांनी राधेश्याम मोपलवार यांनी तीन हजार कोटींची संपत्ती जमवल्याचा आरोप विधिमंडळात केला. मोपलवार यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष, कार्यकारी संचालक म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या देखरेखीखाली समृद्धी महामार्गाची बांधणी झाली आहे. मात्र, समृद्धीच्या कामातून मोपलवार यांनी स्वत:चे आणि कंत्राटदारांचे भले केले. शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने घेतल्याचे आरोप झाले आहेत. गेल्या वर्षी विधिमंडळ अधिवेशनात जालन्याचे आमदार कैलास गोरंट्याल यांनी जालना-नांदेड या समृद्धी महामार्गासाठी जमीन संपादित करताना एक हजार कोटीचा घोटाळा झाला असल्याचा आरोप केला होता. या घोटळयाच्या चौकशीची मागणी देखील गोरंट्याल यांनी केली होती.आमदार गोरंट्याल यांनी केलेले आरोप जालना-नांदेड या समृद्धी महामार्गाचा प्लॅन तीन वर्षांपूर्वी लिक झाला होता. हा महामार्ग होणार याची कल्पना असल्यामुळे काहींनी ग्रीन झोनमध्ये असलेल्या जमिनी शेतकऱ्यांकडून कवडीमोल भावात खरेदी केल्या होत्या. जमीन खरेदी केल्यावर याठिकाणी रातोरात फळबागा दाखवत कोट्यावधी रुपये मिळवले.

स्टँप पेपर घोटाळा स्टँप पेपर घोटाळ्यातील तेलगी प्रकरणात देखील मोपलवार यांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. १९९५ साली स्टँप कार्यालयात अधीक्षक पदावर कार्यरत असताना आपणच अब्दुल करीम तेलगीला स्टँप आणि पेपर वेंडरचे लायसन्स दिल्याची कबुली मोपलवार यांनी कोर्टात दिली होती.

सूर्योदय
शनिवार १३ जुलै २०२४

संपादकीय

# मालकी हक्क

'दंड' न करता 'न्याय' करणारी नवी संहिता वाजत-गाजत अमलात येत असताना आणि राजधानी दिल्लीत या नव्या नियमावलीचे गुणगान सत्ताधाऱ्यांकडून सुरू असताना तिकडे झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना उच्च न्यायालयाने दिलेल्या जामिनाची चर्चा होणे हा खरा काव्यात्म न्याय. सोरेन हे सत्ताधारी भाजपस आव्हान देणाऱ्या झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षाचे प्रमुख होते आणि आहेत. ऐन निवडणुकीच्या काळात त्यांना तुरुंगात डांबून त्या पक्षावर मात करण्याचा प्रयत्न भाजपकडून झाला. त्या प्रांतातील राजकीय रिवाजाप्रमाणे सोरेन तुरुंगात असताना त्यांच्या पत्नीने किल्ला लढवला या वा अन्य कारणांमुळे सोरेन यांस मिळालेला जामीन महत्त्वाचा ठरतो, असे बिलकूल नाही. तर ज्या गुन्ह्यासाठी सोरेन यांस सक्तवसुली संचालनालयाने तुरुंगात डांबले, जो आर्थिक घोटाळा सोरेन यांनी केला असे केंद्रीय पातळीवर कंठशोष करून सांगितले जात होते, ज्या भ्रष्टाचारासाठी सोरेन यांच्यावर ठपका ठेवला जात होता ते वा तसे काही करण्यात सोरेन यांचा हात असल्याचा पुरावा नाही, असे न्यायाधीश सोरेन यांस जामीन देताना म्हणतात ही बाब संबंधित यंत्रणांसाठी आणि ती यंत्रणा राबवणाऱ्यांसाठी लाजिरवाणी ठरते. या नामुष्कीवर निर्विवाद मालकी हक्क केंद्र सरकारचा. संसदेत राजकीय प्रतिस्पर्ध्यास केंद्रीय यंत्रणांच्या ससेमिऱ्याद्वारे नामोहरम करण्याचा कसा प्रयत्न होतो याचे वाभाडे निघत असताना त्या पार्श्वभूमीवर सोरेन यांचे एकूणच प्रकरण मुदलात समजून घेणे रास्त.

सोरेन यांस अटक झाली ३१ जानेवारी रोजी. मनरेगा, खाण कंत्राट इत्यादींतील सोरेन यांच्या कथित घोटाळ्यांची सक्तवसुली संचालनालयाकडून चौकशी सुरू होती. यापेक्षाही गंभीर होता तो लष्करी अधिकाऱ्यांसाठी असलेला भूखंड सोरेन यांनी अवैधपणे विकल्याचा आरोप. हा जमीन विक्रीचा प्रकार प्रथम आढळला लष्करी यंत्रणेस. आपल्या अखत्यारीतल्या जमिनींच्या नोंदी तपासत असताना झारखंडमधील जागेच्या मालकीबाबत काही फेरफार झाल्याचे या विभागास लक्षात आले आणि त्यामुळे त्याची चौकशी सुरू झाली. यात नाव समोर आले ते कोणा भानु प्रताप प्रसाद नामे इसमाचे. ही सरकारी सेवेतील व्यक्ती जमिनींच्या व्यवहारांसाठी त्या भागात ओळखली जाते. लष्कराच्या या जमीन व्यवहारात तिचा सहभाग असल्याच्या संशयावरून गतसाली एप्रिल महिन्यात सक्तवसुली संचालनालयाने धाडसत्र हाती घेतले. त्यात 'कित्येक ट्रंका' भरून जमीन व्यवहारांचा दस्तावेज साठा त्याच्या घरून हाती घेण्यात आल्याचे संबंधितांकडून सांगितले गेले. सरकारी सेवेत असलेल्या या प्रसाद यांचे लागेबांधे थेट मुख्यमंत्री सोरेन यांच्याशी आहेत असे सक्तवसुली यंत्रणेचे म्हणणे. त्यात सोरेन हे केंद्र सत्ताधारी भाजपस राजकीयदृष्ट्या प्रतिकूल हा केवळ योगायोग म्हणायचा. त्याच योगायोग मालिकेतून या प्रसाद यांच्याविरोधात कारवाई सुरू झाली आणि ती करता करता संबंधित यंत्रणेने गतसाली सोरेन यांच्यावरही गैरव्यवहारांचा ठपका ठेवून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला गेला. या प्रसाद यांस तुरुंगात डांबल्यानंतर त्यांच्या मोबाइल फोनमधील तपशील तपास यंत्रणांनी काढून घेतला आणि त्याद्वारेही त्याचे आणि सोरेन यांचे संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला. यात वादग्रस्त ठरलेला जमिनीचा तुकडा प्रत्यक्षात सोरेन यांच्या मालकीचा आहे, असेही सांगितले गेले आणि ही मालकी सिद्ध करण्यासाठी जंग जंग पछाडले गेले. ही लष्करी जमीन खरेदी करण्याचा अधिकार सोरेन यांस मुळातच नाही आणि तरीही त्यांनी हा जमीन व्यवहार केला हा यातील मध्यवर्ती आरोप. 'प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉण्डिंग अॅक्ट' (पीएमएलए) या सध्या विरोधी पक्षीयांविरोधात परवलीच्या झालेल्या कायद्यांतर्गत सोरेन यांच्याविरोधात प्रकरण चालवले गेले आणि अखेर जानेवारी महिन्याच्या अखेरीस त्यांस अटक झाली.

म्हणजे सोरेन यांनी कधी न्यायालयीन कोठडी तर कधी पोलीस कोठडी असे पाच महिने तुरुंगात घालवले. गेल्या शुक्रवारी त्यांस जामीन मिळाला. तो देताना झारखंड उच्च न्यायालयाचे न्या. रंगेन मुखोपाध्याय यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या आरोपपत्राची जी चिरफाड केली ती लक्षात घेण्यासारखी आहे. ज्या जमिनीबाबत सोरेन यांच्यावर ठपका ठेवला गेला त्या जमिनीवर इतकी वर्षे वास्तव्य करणाऱ्यांनी इतक्या वर्षांत या व्यवहाराबाबत काहीच कसा आवाज उठवला नाही येथपासून ते या जमिनीवर सोरेन हे भोजनगृह बांधू इच्छितात



**पावसाळ्यात शेतात दिसणारी शेतकरी राजाची मैत्रीण गोगलगाय एका घराच्या आडोशाला आलेली असताना टिपलेले क्षणचित्र (छाया-: नारायण म्हात्रे, नागोठणे प्रतिनिधी)**

## रायगड शैक्षणिक विकास विश्वस्त निधी संस्थे तर्फे आपटवणे शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

पाली/बेणसे
(धम्मशील सावंत)

रायगड शैक्षणिक विकास विश्वस्त निधी या संस्थेने आपटवणे शाळेतील आदिवासी, गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. सुधागड सारख्या आदिवासी बहुल तालुक्यात आदिवासी बांधव, शेतकरी, कष्टकरी, मजूर कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. येथील गरीब गरजू मुलांना शिक्षण घेण्यात कोणत्या अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी विविध संस्था मदतीचा हात पुढे करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवितात. अशीच शैक्षणिक आणि सामाजिक बांधिलकी रायगड शैक्षणिक विकास विश्वस्त निधी या संस्थेने जोपासली आहे. ङ्क सुधागड तालुक्यातील शाळा आपटवणे येथे या कार्यक्रम प्रसंगी रायगड शैक्षणिक विकास विश्वस्त निधी या संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बापूसाहेब नेणे व सदस्य श्री युवराज महाजन माजी प्राध्यापक पालीवाला कॉलेज तसेच सदस्या श्रीमती सागळे या शाळेत उपस्थित होत्या.ङ्करायगड शैक्षणिक विकास विश्वस्त निधी या संस्थेने या आपटवणे शाळेतील आदिवासी गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रमिला म्हात्रे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. राजेंद्र पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी शाळेचे शिक्षक वृंद गणेश म्हात्रे, सीमा वैद्य व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.




## एस.टी. कर्मचाऱ्यांना भाजपा जिल्हाध्यक्ष राजेशजी सावंत यांच्या प्रयत्नांमुळे मिळणार न्याय.

रत्नागिरी : एस.टी. कर्मचाऱ्यांना आधार आणि पॅन कार्ड लिंक करण्यासाठी ३१ मे २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. प्रत्येक कर्मचाऱ्यांनी करण्यापूर्वीच रत्नागिरी एस. टी. महामंडळ कार्यालयाने टीडीएस रिटर्न दाखल केल्याने, इन्कम टॅक्स विभागाला आधार आणि पॅन लिंक नसणाऱ्या कर्मचाऱ्यांची देखील कर्मचाऱ्यांवर हा भुर्दंड लावण्यात आला आणि ६०००० ते ७०००० रुपये कर्मचाऱ्यांकडून जुन व जुलै महिन्याच्या पगारातून वसूल करण्याचे आदेश देण्यात प्रश्न उभा राहिला. ही बाब तेथील कर्मचाऱ्यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेशजी सावंत यांच्या निदर्शनास आणून दिली. कोणतीही पूर्व कल्पना न देता ही वसूली महमंडळाने कर्मचाऱ्यांवर वसूली न लावता सदर नोटिसचा अभ्यास करून टॅक्स मार्गदर्शन यांच्याकडून मार्गदर्शन घ्या व उपाययोजना करा असे अधिकारी बोडसे साहेब यांना सांगितले. याबाबत कायदेशीर मार्गदर्शन घेतो आणि कर्मचाऱ्यांच्या पगारातून टॅक्स वसुलीची नोटीस मागे घेतो. यातून काहीतरी मार्ग काढूया असा सुवर्ण मार्ग काढण्यात आला. भाजपा जिल्हाध्यक्ष राजेशजी सावंत यांच्या प्रयत्नांमुळे एस. टी. कर्मचाऱ्यांच्या पगारातून होणारी ही वसूली थांबल्याने एस.टी. कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. ङ्क एस.टी. कर्मचारी यांना मी याबाबत मदत करू शकलो याचा मला आनंद असल्याचे राजेशजी सावंत यांनी बोलताना सांगितले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेशजी सावंत यांच्यासह तालुकाध्यक्ष दादा दळी, तालुका सरचिटणीस सुशांत पाटकर, युवा तालुकाध्यक्ष संकेत कदम, प्रदीप पटवर्धन कर सल्लागार आदी कार्यकर्ते आणि एस-टी कर्मचारी उपस्थित होते.




जबाबदारीने ते लिंक करून घेणे आवश्यक होते. आणि ही सदरची माहिती टी.डी.एस. द्वारे ही माहिती शासनाला दिली गेली. परंतु टीडीएस रिटर्न दाखल करण्याची मुदत आणि आधार आणि पॅन लिंक करण्याची मुदत ३१ मे २०२४ असताना त्यापूर्वीच म्हणजे कर्मचाऱ्यांनी आधार पॅन लिंक माहिती देण्यात आली. महामंडळाने ही माहिती इन्कम टॅक्सला दिली आपल्या कर्मचाऱ्यांची ही माहिती दिल्याने याच्या परिणामांचा विचार यावेळी करण्यात आला नाही. परिणामी टी. डी. एस. ची नोटिस एस. टी. महामंडळाला आली मग एस. टी. महामंडळाने ज्यांचे आधार आणि पॅन लिंक नाही अशा आले होते. यामुळे प्रती महा कोणाचे ३०,००० तर कोणाचे ३५,००० याप्रमाणे पगारातून कपात करण्याचे निर्णय घेण्यात आला. यामुळे मुळातच कमी पगार असल्याने कर्मचाऱ्यांचे नुकसान होत होते. त्यातच अनेकांची कर्ज प्रकरणे, शालेय खर्चाचे करायचे काय याबाबत कर्मचाऱ्यांसमोर लावल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पहायला मिळत होती. अनेक ठिकाणी प्रयत्न करूनही आम्हाला न्याय मिळाला नाही असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे होते. जिल्हाध्यक्ष राजेशजी सावंत यांनी तातडीने आपल्या पदाधिकाऱ्यांसह तेथील अधिकारी यांची भेट घेतली व याबाबत सविस्तर चर्चा केली.

# दरीखोरयात अजुनही वयोवृद्ध माता भगिनी नागली पिके लावताना.

तळा कृष्णा भोसले.

रायगड जिल्ह्यातील दरीखोरयात अजुनही वयोवृद्ध माता भगिनी आपल्या काळया मातीत काम करीत नागली पिके लावताना दिसत आहेत.

नागली ही बहुगुणी आणि सहज शक्य काम करायला सोप व त्याच्या मेहनतीच्या मानाने खूपच चांगला नफा देणारे पिक आहे. या नागलीची लागवड ही माळांवर घेतली

जाते. पाण्याचा निचरा होण्यासाठी उभे आडवे व्हने काढली

जातात. म्हणजे जमिनीची धूप थांबते. माळरानावर उभी

आडवी नांगरणी करुन गवत काडी काढून साफ केले जाते.

जी रोपे तयार केली जातात. तिथून आवण खणुन तीची पुनर्रलागवड केली जाते. काही जमिनीवर टाकून देतात. तर काही जण ती रोपे लावतात. रोपे लावली तर ती लवकरच




जीव धरून पुढील स्थिती मार्गक्रमण करते. तर तीच नागली

टाकली तर आठ दिवस तिला उभे रहायला लागतात. त्यामुळे तिची प्रगतीला अडथळा लागतो. अशी या नागली ला मिश्र खते दिली जातात.

नागली ला सध्या भाव चांगला मिळतो. जवळपास

५० ते ६० रुपये किलो भावाने नागली जाते. डायबेटिस

पेशन्ट साठी ही गुणवंत आहे. ती औषधी व पौष्टिक सुद्धा

आहे. डायबेटिस संतुलित ठेवण्याचे काम या आहारातून

होत असल्याने हीला खुप मागणी आहे.

..... प्रतिक्रिया.

नागली पिके ही अतिशय सोपे पिक व अधिक उत्पादन देणारे पिक आहे. यामध्ये काम करणे ही सोप आहे. तिला भावही चांगला मिळतो. सध्या नागली टाकण्याचे, लावण्याचे काम चालू आहे. पाऊस कमी राहीला तर काम सोप असते.

लक्ष्मीबाई जाधव.. जेष्ठ महीला शेतकरी.

भागापेक्षा कमी त्रासाची, कमी कष्टाची नागली पिके

सहज पद्धतीने काम करुन घेता येतात. कमीमजुरात हे

काम करणे सोपे होते. त्यामुळे ही पिके त्याचबरोबर आंतरपिके घेणे सुद्धा त्यामध्ये शक्य होते. वसंत साळवी. शेतकरी.

## दिव्यांग क्रांती संघटने मार्फत सोमवारी एकदिवसीय ठिय्या आंदोलन बी. जी पाटील

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:- आपल्या सर्व दिव्यांग बंधू आणि भगिनींनो, आपणास आज दिव्यांगांच्या न्याय हक्कांसाठी महाराष्ट्र शासन व प्रशासन यांच्या विरुद्ध कायदेशीर संघर्ष करण्याची वेळ आली आहे.कारण समाजातील सर्वात दुर्लक्षित, दुर्बल व विविध समस्यांनी ग्रस्त दिव्यांगांकडे सरकारचे लक्षच नाही.ग्रामपंचायत व इतर स्थानिक स्वराज्य संस्था ५%निधीचा लाभ देण्यात टाळाटाळ करीत आहेत.शसकीय परीपत्रक असून सुद्धा घरपट्टी मध्ये ५०%सवलत देत नाहीत.वेगवेग़ळी कारणे सांगितली



जातात.व्यवसायासाठी जागा व स्टाल दिले जात नाहीत.५%निधीचा लाभ हा वस्तू स्वरूपात देतात.जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या योजना पासून बरेचसे दिव्यांग अर्ज करुन ही वंचीत आहेत.एस.टी.प्रवास सवलतीत सुध्दा अन्याय होत आहे.काही एन.जीं.ओ.,पुढारी व कंपन्या संगनमताने दिव्यांगांना अत्यंत कमी प्रतीच्या सायकली, व्हीलचेअर्स वगैरे वस्तू वाटप करुन फसवतात. दिव्यांगांच्या विकासासाठी ज्या योजना जाहीर केल्या जातात त्यांचा लाभ फक्त २०% दिव्यांगांना होत आहे.बाकी दिव्यांग वंचित आहेत.अर्थ संकल्पात दिव्यांगांकरीता काहीच मिळत नाही.संजय गांधी दिव्यांग व निराधार योजना व श्रावण बाळ योजना मध्ये दिव्यांग व निराधार यां फक्त रू.१५००/- मिळतात या रकमेत माणूस एक महिना जगू शकतो काय?तो रु.५०००/-पर्यंत वाढविण्यासाठी अर्ज, विनंत्या, आंदोलने करून ही वाढविला जातो नाही.तसेच निर्वाह भत्ता दर महिन्याला येत नाही तर कधी कधी दोन, तीनं तर कधी चार महिने लागतात.दिव्यांग व्यक्तीला नातेवाईक असतील तर हा भत्ता मिळत नाही.हा अन्याय सतत चालू आहे.दिव्यांगांचे कुपोषण व हाल होत आहेत.बहुतेक दिव्यांग रेशनिंग धान्यापासून वंचीत आहेत.अशा परिस्थितीत दिव्यांग जगणार कसा? या सर्व अन्याया विरुद्ध कायदेशीर संघर्ष करावाच लागेल.आपल्या दिव्यांग क्रांती संघटने मार्फत सोमवार दिनांक १५/०७/२०२४ रोजी सकाळी १०-३०वाजता वाजता अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालया जवळ जमून आपण सर्वांनी हल्ला बोल ठिय्या आंदोलन व एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करून सरकारला इशारा द्यायचा आहे.आपण कोणतेही कारणं अथवा निमित्त नं सांगता हजर राहून आपली एकजूट व ताकद दाखवून द्यायाची आहे. आपला एक दिवस आपल्या न्याय्य हक्कांसाठी द्यायचा आहे.हीच वेळ आहे.''उठ दिव्यांगा जागा हो,तू क्रांतीचा धागा हो!''- -बी.जी.पाटील.ङ्ग (राजेश बाष्टे)

## स्वामी फाऊंडेशन चे अध्यक्ष महेश परशुराम कदम यांच्यामार्फत वडिलांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त चंदरगाव शाळेला ३ ग्रीन बोर्डची भेट

पाली/बेणसे

दि.(धम्मशील सावंत)

माजी सैनिक स्वर्गीय परशुराम गणपत कदम यांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त सुधागड तालुक्यातील चंदरगाव शाळेला ३ ग्रीन बोर्ड (शैक्षणिक फळे)भेट देण्यात आले. वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त सामाजिक बांधिलकी जपत महेश परशुराम कदम, संस्थापक अध्यक्ष: स्वामी फाऊंडेशन ,ङ्गभारतीय मराठा महासंघ -: महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ङ्गतसेच भारतीय जनता पार्टी उपाध्यक्ष ठाणे शहर ( जिल्हा)ङ्गयांच्याकडून मनसे उपाध्यक्ष सुधागड तालुका केवल




ग. चव्हाण यांच्या माध्यमातून ङ्गमाध्यमिक विद्यालय चंदरगाव शाळेला ३ बोर्ड ( फळे) सप्रेम भेट देण्यात आले ..ङ्गयावेळी शिक्षक वर्ग व विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्या कडुन महेश कदम यांचे आभार मानण्यात आले . कुणाचाही वाढदिवस असो अथवा पुण्यतिथी या निमित्त विविध सामाजिक ,विधायक, शैक्षणिक उपक्रम राबवून साजरे केल्यास आपल्या हातून समाजसेवा घडली जाईलच, मात्र समाजात एक आदर्शवत प्रेरक संदेश देखील जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ङ्गयावेळी केवल मनसे उपाध्यक्ष सुधागड तालुका तथा माजी विद्यार्थी ङ्गकेवल चव्हाण, चव्हाणवाडी शाखा अध्यक्ष ( माजी विद्यार्थी) परेश वनगळे ,तसेच माध्यमिक विद्यालय चंदगाव शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग शिपाई तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते..ङ्ग

## 'कू' वापरत.

खरे तर या घटनेचे कोणास आश्चर्य कसे वाटले नाही, याचे आश्चर्य वाटते. देशाच्या सर्वोच्च नेत्याच्या आदेशावरून लाखो, कोट्यवधींनी हे अ‍ॅप आपापल्या मोबाइलमधे डाऊनलोड करून घेतले. सर्वोच्च नेत्याच्या साजिंद्यांपाठोपाठ अन्य कोट्यवधी जल्पकांच्या आत्मनिर्भर गँग्सनी देशाच्या प्रतिष्ठेसाठी हातमिळवणी केली आणि हे अ‍ॅप वापरण्याचा निर्धार केला. कोण कोणते दीडदमडीचे ट्विटर! हजारो वर्षांची उज्ज्वल परंपरा असलेल्या, महासत्ता होऊ घातलेल्या, विश्वगुरूंची खाण असलेल्या या देशाच्या इभ्रतीचा अपमान करू धजते यामुळे 'सव्वासो क्रोर' भारतीयांना आलेल्या सात्त्विक संतापातून याचा जन्म झालेला.

इस्लामधार्जिण्या, पुरोगामी हिंदू धर्म बुडव्यांना याद्वारे चोख उत्तर दिले जात होते. लोकशाहीची जननी असलेल्या प्रदेशाच्या उद्धारासाठी कार्यरत जगातील सर्वात मोठ्या पक्षाच्या अनेक नेत्यांनी, अनुयायांनी याचा स्वीकार केलेला! या पक्षाचे अधिकृत सदस्यच मुळी १० -१२ कोटी. तेव्हा गेला बाजार सर्वोच्च नेत्याच्या आदेशानुसार इतक्या साऱ्यांच्या मोबाइलमधे तरी याचे अस्तित्व असणार. आणि तरीही हे 'कू' नामे अ‍ॅप मृत होते हे आश्चर्य आणि त्याचे कोणासही काही वाटत नाही, राष्ट्रीय शोक व्यक्त होत नाही, निती आयोग 'कू'च्या अवस्थेत लक्ष घालत नाही हे महद्‌आश्चर्य! ते व्यक्त करणे हे कर्तव्य ठरते. याचे कारण एकेकाळच्या 'ट्विटर'ला आणि आताच्या 'एक्स'ला पर्याय म्हणून साधारण पाच वर्षांपूर्वी या पुण्यभूमीत 'कू' या स्वदेशी मायक्रोब्लॉगिंग साइटचा घाट घातला गेला. सुरू झाल्या झाल्या केवढे कौतुक झाले या 'कू'चे. दिल्लीतून साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून त्या पक्षाच्या राष्ट्र पुनरुत्थानासाठी भूतलावर अवतार घेतलेल्या गल्लीतील साध्या पक्ष कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनी या स्वदेशी भारतीय ट्विटरानुकरणाचा पुरस्कार केला. तथापि बुधवारी या 'कू'च्या पक्षाने आकाशाकडे पाहात चोच उघडून प्राण सोडले. हा हंत हंत नलिनी गज उज्जहार वगैरे वगैरे.

कारण काय? तर मागणी नाही आणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे गुंतवणूकदार नाहीत. हे आश्चर्यावर आश्चर्य. खरे तर एका आत्मनिर्भर अभिव्यक्तीसाठी संभाव्य महासत्तेतून एकही गुंतवणूकदार 'कू'त गुंतवणूक करण्यासाठी पुढे येऊ नये यास काय म्हणावे? यामागे खरे तर भारताची प्रगती पाहू न शकणाऱ्या पाश्चात्त्य शक्तींचा हात असणार! अन्यथा पंतप्रधानादींनी आशीर्वादलेल्या उपक्रमासाठी एकही मायेचा पूत या देशात उभा राहिला नाही, हे कसे? आणि लागून लागून अशी कितीशी रक्कम या 'कू'पक्ष्यास लागणार होती? गेल्या काही वर्षांत 'कू'ने ५.७ कोटी डॉलर्स उभे केलेले. गेल्या तीन वर्षांत मात्र इतकाही पैसा उभा राहू शकला नाही. अब्जावधींची कंत्राटे मिळवणाऱ्या 'अ'घटित उद्योगपतींसाठी ही इतकी रक्कम म्हणजे खरे गल्ल्यातली चिल्लर. यापेक्षा कित्येक पट विवाहपूर्व सोहळ्यांवर खर्च होते. किंवा शहराशहरांत कबुतरांस चारा घालण्यावर आपल्या देशात तो घालणाऱ्यांकडून अधिक रक्कम खर्च होत असेल. पण त्यातील काही दाणेही या 'कू'पक्ष्याच्या वाट्यास येऊ नयेत? जवळपास सहा कोटी मोबाइलमध्ये हे अ‍ॅप होते एकेकाळी. 'ट्विटर'ची डिट्टो प्रतिकृती असलेल्या या भारतीय अनुकरणाचे कौतुक फक्त भारतीयांनाच होते असे अजिबात नाही. रोनाल्डिनोसारखा फुटबॉलपटू, दलाई लामा यांच्यासारखे धर्मगुरू असे अनेकजण 'कू' वापरत. 'ट्विटर' पूर्णपणे एलॉन मस्क याच्या हाती गेल्यावर तर ब्राझीलमधे 'कू'चे अनुयायी इतके वाढले की पाहता पाहता त्या देशातही 'ट्विटर' मागे पडले. अर्थात त्यामागे 'कू'चे नाममाहात्म्य होते, हे दुर्लक्षता येणार नाही हे खरे. एकेकाळची पोर्तुगालची वसाहत असलेल्या ब्राझीलमधे पोर्तुगीज बोलणारे अधिक असणार हे उघड आहे. पोर्तुगीज भाषेत 'कू' म्हणजे मानवाचा पार्श्वभाग. या 'वास्तवा'मुळे 'कू' त्या देशात समाजमाध्यमी कमालीचे लोकप्रिय ठरले. ब्राझीलमधील सर्वात मोठे 'कू' असा त्याचा उल्लेख होत असे. तरीही हा 'कू' पक्षी मृत झाला. त्याच्या प्रवर्तकांनी 'कू'स मूठमाती देत असल्याची अधिकृत घोषणा केली. असे का झाले असावे?

केवळ अभिनिवेश हेच भांडवल असेल तर काय होते, याचे हे जिवंत उदाहरण. आर्थिक पायाभूत सोयींचा अभाव असताना केवळ कोणास तरी धडा शिकवण्याच्या उद्देशाने हे 'कू' जन्मास घातले गेले. त्यात काही स्वतंत्र बुद्धिमत्ता होती म्हणावे तर त्याचा पूर्ण अभाव. अगदी पक्षाच्या बोधचिन्हासह ही तशीच्या तशी मूळ ट्विटरची प्रतिकृती होती. यशस्वी प्रारूपांच्या प्रतिकृती हे अर्थातच आपले वैशिष्ट्य! अ‍ॅमेझॉन यशस्वी ठरले? काढा फ्लिपकार्ट ! (तेही आपणास आपल्या हाती राखता आले नाही.) 'उबर' यशस्वी ठरली? लगेच भारतीय अनुकरण 'ओला' तयार. जगात 'टेड टॉक' गाजते आहे काय? लगेच त्याच्या बिनडोक मराठी अनुवादाचा उदय झालाच म्हणून समजा! वास्तविक उत्तम मूळ उत्पादन उपलब्ध असताना त्याच्या प्रतिकृतींस यशस्वी होणे फार अवघड असते हे सामान्यज्ञान. त्यातही मूळ उत्पादनापेक्षा अधिक काही मूल्यवर्धन, नावीन्यपूर्ण बदल असे काही असले तर प्रतिकृतीही टिकाव धरू शकते. तथापि आपल्या देशी 'कू'मध्ये या सगळ्याचा ठार अभाव होता. भारतीय भाषांत 'कू' करायची सोय सोडल्यास यात ट्विटरपेक्षा अन्य काहीही वेगळे नव्हते. तसे ते नंतर करावयाचे तर कल्पनाशक्ती लागते आणि ती आहे असे गृहीत धरले तरी कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी पैसा लागतो. 'कू'बाबत तीच अडचण आली आणि यात काही गुंतवणूक-योग्य न आढळल्याने निधीचा रोख आटला. परिस्थिती इतकी बिघडली की बंगलोर-स्थित 'कू'वर कामगार कपातीची वेळ आली. पण एकट्या 'कू'लाच या परिस्थितीसाठी बोल लावणे योग्य नाही.

## रायगड जिल्ह्यात मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी

जिल्हाधिकारी किशन जावळे

पाली /बेणसे दि. (धम्मशील सावंत )राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी, आर्थिक स्वातंत्र्य, त्यांचे आरोग्य, पोषणात सुधारणेसाठी आणि बळकटीकरणासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' ही महत्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण ही योजना ऐतिहासिक योजना आहे. या योजनेची जिल्ह्यात प्रभावीपणे त्यांनी यावेळी दिल्या. या योजनेच्या यशस्वीतेसाठी प्रशासनातील सर्व घटकांचे सहकार्य घ्यावे असेही त्यांनी यावेळी सांगितले. ङ्गआधार कार्ड नुसार माहिती अनिवार्यङ्गमुख्यमंत्री लाडकी बहीण योजने साठी नारी शक्तिदूत अ‍ॅपद्वारे अर्ज भरताना संबंधित महिलेचे नाव, जन्म दिनांक, संपूर्ण पत्ता आदी माहिती आधारकार्ड नुसारच भरणे अनिवार्य करण्यात आले आहे. ङ्गनारी शक्तिदूत अ‍ॅपमध्ये लाभार्थी महिलेचे नाव



अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.ङ्ग जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण'योजनेची आज आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, उपजिल्हाधिकारी सा.प्र.रविंद्र शेळके,ङ्गउपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण निर्मला कुचिक,जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनित म्हात्रे,जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम कोशेट्टी,अलिबाग नगर परिषद मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आदी उपस्थित होतेङ्ग जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी या योजनेचे जिल्ह्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी यांनी सूक्ष्म नियोजन करावे अशा सूचना यावेळी दिल्या. तसेच ग्रामपंचायत तसेच शहरांमध्ये योजनेची व्यापक प्रसिद्धी करावी. संपूर्ण जिल्ह्यात पोस्टर्स, बॅनर, जिंगलद्वारे प्रचार व प्रसार करावा.प्रत्येक शनिवार चावडी वाचनचे आयोजन करावे, अशा सूचनाही भरताना त्यांच्या आधारकार्डवर जे नाव लिहिले आहे तेच नाव अर्जात लिहावे. आधारकार्डवरील जन्म दिनांक अ‍ॅपमध्ये नोंदवावा. आधारकार्डवर जन्मदिनांक नसल्यास जन्म दाखल्यावरून जन्मदिनांक घेण्यात यावा. आधारकार्डनुसार अर्जदाराचा संपूर्ण पत्ता आणि अन्य माहिती तंतोतत भरावी, अशी सूचना करण्यात आली आहे. आधारकार्डवरील नावाप्रमाणे बँकेच्या खात्यावरही तेच नाव असावे. तसेच बँक खाते आधारशी संलग्न असावे. ङ्गगावपातळीवर ऑफलाइन अर्जङ्गनारी शक्तिदूत अ‍ॅपद्वारे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्यात येत आहेत. मात्र, गावपातळीवर अर्ज भरताना काही अडचणी येत आहेत. दुसरीकडे, अर्ज भरण्यासाठी गर्दी वाढत आहे. त्यामुळे गर्दी टाळण्यासाठी गावपातळीवर ऑफलाइन पद्धतीने पात्र लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यात येत आहेत. त्यासाठी ग्रामपंचायतींमध्ये वॉर्डनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहेत.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
गुरूवार ११ जुलै २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

**मंडणगड येथे शुक्रवारी २९ ला महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रवासी राजा दिन आयोजित .अंमलबजावणी सुरू केली जाणार असल्याची माहिती आगार प्रमुख सतीश पाटील यांनी दिली.**

मंडणगड प्रतिनिधी

प्रवाशांच्या समस्या ,तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक सोमवारी व शुक्रवारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रवासी राजा दिन आयोजित करण्यात येणार आहे . हे अभियान १५ जुलैपासून सुरू होणार असून मंडणगड आगारातर्फे या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू केली जाणार असल्याची माहिती आगार प्रमुख सतीश पाटील यांनी दिली.२९ जुलै २० २४ रोजी राप मंडणगड आगारात प्रवासी राजा दिन साजरा करण्याचे नियोजन केले असून ,सदर दिवशी सकाळी दहा ते दोन या वेळेत प्रवासी, प्रवासी संघटना ,शाळा, महाविद्यालय हेआपल्या समस्या, तक्रारी ,सूचना लेखी स्वरूपात मांडू शकणार. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील .विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे.

## मंडणगड देव्हारे वडवली आतले शेवरे बोरथळ गाडी आजपासून सुरुशिवसेना मंडणगड तालुका प्रमुख प्रतापजी घोसाळकर यांच्या शिफारशीने



मंडणगड प्रतिनिधी

दापोली विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार सन्मा श्री योगेशदादा कदम साहेब यांच्या विशेष प्रयत्नाने शिफारशीने तसेच शिवसेना मंडणगड तालुका प्रमुख प्रतापजी घोसाळकर साहेब यांच्या पाठपुराव्याने बोरीवली मंडणगड देव्हारे वडवली आतले शेवरे बोरथळ गाडी आजपासून चालु झाली आहे... तिन्ही गावचे ग्रामस्थांच्या वतीने गाडीचे जल्लोष मध्ये स्वागत करण्यात आले ड्रायव्हर किनर यांच शाळ पुष्पगुच्छ देऊन स्वागत केलं...ङ्गतिन्ही गावात आनंदाचा वातावरण..ङ्गतिन्ही गावांच्या वतीने मा.आमदार योगेशदादा कदम साहेब व तालुका प्रमुख घोसाळकर साहेब यांच मनपूर्वक आभार.ङ्गनवतरुण विकास मंडळ शेवरे

# श्रीवर्धन बोर्ली एसटीमध्ये पाणी गळती; प्रवाशांनी केले व्हिडीओ



श्रीवर्धन कोलमांडाला सोपान निंबरे, श्रीवर्धन डेपोची सकाळी दहा वाजता सुटणारी शिवशाही गाडीची अवस्था बिकट असल्याची व्हिडीओ प्रवाशी सुयोग लांगी यांनी सोशल मीडियावर व्हायरल केले आहे. यामध्ये गाडीच्या वरील टपावरून सर्व सीटवर पावसाचे पाणी येत होते. ही अक्षम्य एसटी महामंडळाकडून प्रवाशांची फसवणूक होत असल्याचे दिसून येत आहे. देश स्वातंत्र्य होऊन आता प्रशासनाकडून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने अनेक उपक्रम व कार्यक्रम साजरे केले जातात मात्र नागरिकांच्या मूलभूत सुविधा हिसकावल्या जात आहेत. ग्रामीण भागात प्रवासाचं एकमेव साधन म्हणजे बस आणि तीही सुविधा नीट नागरिकांना मिळू नये इतके बिकट दिवस सध्या श्रीवर्धन तालुक्यालीतील ग्रामस्थांवर आले आहेत. एसटीमध्येच चक्क छत्र्या उघडून बसण्यासारखी वेळ आल्याने संताप व्यक्त केला जात आहे. ही विदारक दृश्यं पाहून सोशल मीडियावरुन तालुक्यातील नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. श्रीवर्धन डेपो नेहमी लांब पल्ल्याच्या मार्गावर चांगल्या गाड्या पाठविण्याकडे दुर्लक्ष करत आहे.ङ्गमागील वर्षांमध्ये अनेकवेळा श्रीवर्धन डेपोच्या गाड्या खिळखिळीत झाल्या होत्या धावत्या गाड्यांची चाके निघत होती तर केव्हा गाड्या मधेच बंद पडत होत्या, चाके पंचर होत होते. आजही डेपोत सुधारणा होत नाही आहे असे दिसत आहे. डेपोत फलाटक्रमांकवर आलेल्या गाड्यांची स्पीकर अलाउंस होत नाही. गाड्याचे फलक मोडकेतोडके असून त्यावर गावांची नावे अदृश्य आहेत. गाड्या नेहमी उशिरा लागतात, गाड्यांची अवस्था नियमात नाही. डेपो चौकशी यंत्रणेकडून वयोवृद्ध नागरिकांसह सर्व प्रवाशांना नीट उत्तरे दिली जात नाही. गाडी अजून आली नाही असे विचारले असता किशातून गाड्या काढायच्या का असे उत्तर मिळतो. याकडे मंत्रीमहोदयांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधिंनी लक्ष देणे गरजेचे आहे.ङ्गआता धावणाऱ्या बस मधून पावसाच पाणी सगळ्या सीटवर गळत असल्याचा व्हिडिओ प्रवाशांनी स्वतः वायरल केला आहे. श्रीवर्धन एसटी डेपोची ही अवस्था थांबणार की नाही असा प्रश्न सध्या स्थितीत आहे. कोणी लक्ष देईल का श्रीवर्धन डेपोच्या या कारभारावर, कोणी वाली आहेका या परिस्थितीला?

## ग्रुप ग्रामपंचायत सिद्धेश्वर व अंगणवाडी सेविका यांच्या सौजन्याने लाडकी बहीण योजना कॅम्प व २१ गणपती येथे वृक्षारोपण कार्यक्रम





रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव: ग्रुप ग्रामपंचायत सिद्धेश्वर तसेच अंगणवाडी सेविका यांच्या सौजन्याने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ बहुसंख्य महिलांना मिळावा या साठी दिनांक ११/७/२०२४ रोजी २१ गणपती मंदिर सिद्धेश्वर येथे कॅम्प आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला बहुसंख्य महिलांनी हजेरी लावली होती. या योजनेचा लाभ संदर्भात लागणारी कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी व फॉर्म भरण्यासाठी सिद्धेश्वर ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन सरपंच आशिका पवार, उपसरपंच शरद किंजावडे, ग्रामसेवक आजिनाथ खेडकर, सदस्य वरघडे मॅडम, सदस्य पवार मॅडम, मनोहर जांभुळकर, सामाजिक कार्यकर्ता चंद्रकांत चव्हाण, माजी सरपंच योगेश सुरावकर, ग्रामपंचायत कर्मचारी सचिन मुंडे, गणेश महाले, संघ अध्यक्ष प्राची यादव, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि उपस्थित महिला व पुरुष या सर्वांनी हातभार लावून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या कार्यक्रमासाठी मेहनत घेऊन गावातील महिलांना या योजनेचा लाभ मिळवून दिला तसेच गणपती मंदिरराच्या आजूबाजूने अनेक प्रकारची झाडे लावू वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पाडला

## श्री स्वामी समर्थ मठात गुरुवर्य स्व. दादा दरेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्य वाटप

कर्जत (जयेश जाधव)

श्री स्वामी समर्थ मठाचे संस्थापक, मठाधिपती गुरुवर्य स्व. दादा महाराज दरेकर यांच्या चौदाव्या स्मृतिदिनानिमित्त कर्जत तालुक्यातील पळसदरी येथे मठाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि त्यांच्या स्मृतींना उजाळा देत विनम्र अभिवादन करण्यात आले.ङ्गङ्गप्रतिवर्षाप्रमाणे यंदाही मठाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये १०० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले व त्यांच्या संगोपनाचा संकल्प भक्तांच्या आणि सेवेकऱ्यांच्या माध्यमातून करण्यात आला. या उपक्रमाने पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.त्याचबरोबर, पळसदरी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ङ्गङ्गयाप्रसंगी दादांचे कुटुंबीय, शिष्यवर्ग, सेवेकरीवर्ग, शालेय शिक्षक व भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी गुरुवर्य दादांच्या कार्याचे स्मरण केले आणि त्यांचे आशीर्वाद घेतले.ङ्गङ्गङ्गमठाच्या प्रमुखांनी आपल्या भाषणात गुरुवर्य दादांच्या सामाजिक कार्याची महत्त्वाची भूमिका विषद केली व त्यांनी पुढील काळातही असेच उपक्रम चालू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मठाने आजवर अनेक सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणीय उपक्रम राबविले आहेत आणि भविष्यातही हे कार्य अविरत चालू ठेवण्याचे वचन दिले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी मिळून वृक्षारोपणाचे महत्त्व सांगत पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतला. उपस्थितांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले आणि पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.ङ्गगुरुवर्य स्व. दादा महाराज दरेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजिलेल्या या कार्यक्रमाने मठाच्या सेवाकार्यात एक नवीन उर्जा प्राप्त केली आहे आणि भविष्यात अधिकाधिक सेवाभावी उपक्रम राबविण्याची प्रेरणा दिली आहे.ङ्गविक्रांत दरेकर मार्गदर्शन नुसार हा कार्यक्रम पार पडला.ङ्ग यावेळी वकिल प्रदीप सुर्वे, राजेंद्र निगुडकर, राजू पोतदार, महेंद्र निगुडकर, प्रकाश दरेकर, मंगेश रामधरणे,अभिजीत दरेकर, दादू दरेकर कृष्णकांत दरेकर, मनोज देशमुख, नितेश मांडे , अतुल सावंत,शिक्षक रितेश नारायण दरेकर, मॅडम पूजा पवार, अपिना थैल गवळी सर, इत्यादी स्वामी भक्त उपस्थित होते









मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई – ४०००८१– अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )